सकाळ
१६ ऑक्टोबर ९९

## कंपनी सचिव व्यवसाय मार्गदर्शन

कोल्हापूर : कंपनी सेक्रेटरीज् स्टुडन्ट फोरम कोल्हापूरतर्फे १२ वी पास विद्यार्थ्यांसाठी कंपनी सेक्रेटरी एक व्यवसाय, त्याचे महत्व, नोकरीच्या संधी व त्यामध्ये मराठी विद्यार्थी, विद्यार्थीनींनी प्रयत्न पूर्वक हा व्यवसाय निवडावा यासाठी करिअर कौसिलिंग करण्यात आले.

विवेकानंद कॉलेज व ताराराणी विद्यापीठ या ठिकाणी विकास खरे, दिलीप पांगे, भरत शहा, बी. जी. कुलकर्णी, वलगडे तर छ. शहाजी कॉलेज व कॉमर्स कॉलेज या ठिकाणी पुणे शाखेचे चेअरमन व्ही. एस. खानवलकर, एस. एन. पाटील, व्ही. जी. कुलकर्णी, दीपक गोखले, हरिभाऊ साळुंखे, कु. तेजस्विनी घोरपडे, कु. भक्ती पटवर्धन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

परीक्षा पद्धती व मूलभूत अभ्यासक्रम (फौंडेशन कोर्स) माध्यमिक परीक्षा (इंटरमिजिट) व अंतिम परीक्षा असणारे विषय, पास होण्यासाठी असणारी पात्रता लेवल इ. विषयाबद्दल श्री. खानवलकर व विकास खरे यांनी अनमोल मार्गदर्शन केले. विशेष गोष्ट म्हणजे फौंडेशन परीक्षा यशस्वी पास झालेल्या कोल्हापुरातील एकमेव विद्यार्थीनी कु. भक्ती पटवर्धन हिचा विशेष उल्लेख विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल असे श्री. खानवलकर यांनी कॉमर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर बोलताना सांगितले. जवळ-जवळ ६०० विद्यार्थ्यांनी यावेळी करीअर कौसिलिंग मध्ये भाग घेतला.

अधिक माहितीसाठी संपर्क पत्ता-